MHYA100005342026

दाखल तारीख – १२/०३/२०२६
नोंदणी तारीख – १२/०३/२०२६
निकाल तारीख – २७/०३/२०२६
कालावधी – ०० व.०० म.१५ दि.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, केळापूर, ता.केळापूर, जि.यवतमाळ यांचे न्यायालयात.**

(पिठासिन अधिकारी– सायमा एन.ए.एस.शेख यांचे समक्ष)

**नियमीत फौजदारी खटला क्र. ६८/२०२६** **निशाणी क्र.१८**

महाराष्ट्र शासन,
मार्फत – पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे,
पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ. ...... **अभियोग पक्ष**

**विरुद्ध**

गणेश सदाशिव ढोंगे,
वय – ४० वर्ष, धंदा– मजुरी,
रा. मोहदा, ता. केळापूर, जि. यवतमाळ ....... **आरोपी**

**गुन्हे** – भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम – ११८(१), ३५२, ३५१ (२)(३) अन्वये.

........................................................................................................

अभियोग पक्षाचे सहा. सरकारी अभियोक्ता. :– श्री. एस.बी.जगताप.
विधिज्ञ आरोपीतर्फे :– श्री एस.आर.काळे.

........................................................................................................

**न्या य नि र्ण य**

(दिनांक –२७ मार्च, २०२६)

१) आरोपीवर सदरचा खटला भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१), ३५२, ३५१ (२)(३) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे म्हणणे थोडक्यात खालील प्रमाणे नमूद करता येईल :**

२) घटना दिनांक २१/०२/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान शेतशिवार चिखलदरा येथे आरोपीच्या शेतात घडली होती. त्यावेळी फिर्यादी गोपाळ सावसाकडे यांच्या म्हशी पाणी पाजण्या करीता नाल्यावर घेउण जात असतांना म्हशी आरोपीच्या शेतात गेल्यामुळे आरोपीनी फिर्यादीस म्हशी चारता येत नाही का असे म्हणुण हातातील विळयाने फिर्यादीच्या पाठीवर व डोक्यावर मारुण जखमी केले. म्हणून प्रस्तूतची फिर्याद दाखल झालेली आहे.

३) सदर खटल्यातील आरोपपत्राचे अवलोकन केल्यानंतर, आरोपीविरुध्द दोषात्मक बाबी आढळुन आल्याकारणाने, आरोपीविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१), ३५२, ३५१ (२)(३) अन्वये निशाणी क्रमांक १० प्रमाणे दोषारोप निश्चित केले. वरील सर्व आरोप आरोपीला त्याच्या मातृभाषेत समजावून सांगितले असता, आरोपीने सर्व आरोप नाकारले व सदरचा खटला चालविण्यात यावा अशी विनंती केली.

४) सदर खटला अभियोगपक्षाच्या पुराव्याकामी असताना फिर्यादी व आरोपी यांनी नि. क्र. १२ अन्वये संयुक्त तडजोड अर्ज दाखल केला. परंतू सदरील खटल्यातील दोषारोप हे अतडजोड पात्र असल्यामुळे, सदर अर्ज नाकारण्यात आला. तसेच फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र. १३ अन्वये पुरसीस दाखल करुण त्यांचा एकमेकामध्ये वाद राहीला नसल्याचे व यानंतर फिर्यादी यांना यापुढे प्रकरण चालविण्याचे नसल्याचे कथन केले आहे.

५) सदरच्या खटल्यात अभियोग पक्षातर्फे केवळ एक साक्षीदार फिर्यादी साक्षीदार नामे – बापुराव राघु लोणकर यांनी त्यांची साक्ष साक्षीदार क्रमांक ०१ म्हणुन निशाणी क्रमांक १५ अन्वये नोंदविली. सदरील साक्षीदाराने त्याच्या तोंडी पुराव्यात आरोपीविरुध्द काहीही दोषात्मक सांगितले नाही. तसेच सहा सरकारी अभियोक्ता यांनी अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला. तसेच प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द काहीही दोषात्मक पुरावा नसल्यामुळे, आरोपीला भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१ मधुन सुट देण्यात आली.

६) अभियोग पक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस.बी.जगताप व आरोपीचे विधिज्ञ श्रीमती एस.आर.काळे यांचा युक्तीवाद ऐकला. सदर खटल्यात नमूद असलेल्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमीमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक २१/०/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेच्या आरोपीच्या शेतामध्ये मौजे–चिखलधरा शेतशिवार ता. केळापूर येथे आरोपीने फिर्यादीस विळयाने डोक्यावर व पाठीवर मारुण दुखापत केली व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८ (१) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| २) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीचा सार्वजणीक शांततेचा भंग होईल अश्याप्रकारे हुतुपूरस्पर अपमान केला व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५२ अन्वये गुन्हा केला आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीस जीवे | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३५१ (२),(३) अन्वये गुन्हा केला आहे काय ? | |
| ४) | काय आदेश? | **अंतिम आदेशा प्रमाणे** |

**::<u>कारणमीमांसा</u> ::**

**<u>मूद्दा क्रमांक १ व ३ करीता :–</u>**

७) सदरील खटल्यातील नमूद पुराव्याच्या गुणवत्तेनुसार सारांशा करीता वरील सर्व मुद्ये एकत्रीतरीत्या विचारात घेण्यात येत आहे.

८) भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१),३५२,३५१ (२)(३) अन्वये दोषारोप सिध्द करण्यासाठी घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीस विळयाने डोक्यावर व पाठीवर मारहाण करुण जखमी केल्याचे व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षातर्फे संशया पलीकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त कायदेशीर तरतुदींचा विचार करुन उपलब्ध पुराव्याचे विवेचन करणे आवश्यक आहे.

९) प्रस्तुत खटल्यातील प्रमुख पिडीत साक्षीदार फिर्यादी नामे–बापुराव राघु लोणकर यांनी निशाणी क्र. १५ वरील तोंडी पुराव्यात असे नमुद केले आहे की, त्यांना घटनेची वेळ, ठिकाण आठवत नाही तसेच त्यांना घटना काय घडली होती हे देखील आठवत नाही तसेच आरोपी सोबत त्यांचे न्यायालयाबाहेर मिटल्यामुळे साक्षकामी न्यायालयात हजर झाल्याचे त्यांनी कथन केलेले आहे. तसेच फिर्याद वर त्यांची केवळ सही असुन मजकूर माहीत नसल्याचे कथन केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे सर्व उत्तर सुचक प्रश्न नाकारुन, त्यांची व आरोपीची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली असल्याचे मान्य केले आहे.

१०) एकंदरीत सदर खटल्यातील फिर्यादी यांनी त्यांच्या उपरोक्त पुराव्यात आरोपीविरुध्द काहीही दोषात्मक सांगितलेले नाही. त्यामुळे फिर्याद मधील मजकुर सिध्द होत नाही. म्हणुन घटनेच्या दिवशी आरोपीने फिर्यादीस विळयाने मारहाण करुण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सिध्द होत नाही. म्हणून **<u>मुद्या क्रमांक १ व ३ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.</u>**

**<u>मुद्या क्रमांक ४ करीता</u> :–**

११) सदरील मुद्याच्या निष्कर्षासाठी मी खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करत आहे.

## // आ दे श //

१) आरोपी नामे – गणेश सदाशिव ढोंगे यांची भारतीया नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१), ३५२, ३५१ (२)(३) या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे पूर्वी दाखल केलेला जातमुचलके व जामिनकदबे रद्द करण्यात येतात व त्यांच्या जामीनदारास जामीन बंध पत्रातून मुक्त करण्यात येते.

३) आरोपीची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ४८१ (१) अन्वये रक्कम रुपये १५०००/– चे वैयक्तीक बंधपत्र स्वीकारुण पुर्तता करण्यात आली.

४) सदरील खटल्यात जप्त असलेला मुददेमाल विळा अपील

कालावधी नंतर विक्री करुण मिळणारी रक्कम शासन जमा करण्यात यावी.

५) आरोपीला लगेचचं मुक्त करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतलेखीत व उदघोषीत करण्यात येतो.)

Sd/–

दिनांक :– २७ मार्च, २०२६
ठिकाण :– केळापुर.

(सायमा नि.ए.एस.शेख)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्रमांक–२, केळापूर.